# उल्हासनगर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग

८/१०/२४
१२:४५

दिनांक : ०८/१०/२०२४

# प्रेसनोट

दिनांक ०४/१०/२०२४ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तर्फे सुरु करण्यात आलल्या ७ रस्त्यांच्या कामाबाबत मा.स्थायी समिती सभागृह येथे मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली.

➢ बैठकीच्या वेळी खालील ७ रस्त्यांच्या कामांबाबत चर्चा झाली, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-

१) उल्हासनगर-४ येथील नेताजी चौक ते कैलाश व्हाया कुर्ला कॅम्प पर्यतच्या रस्त्याच सिमेंट कॉक्रीटीकरण करणे.

२) उल्हासनगर-५ येथील न्यू इंग्लिश हायस्कुल ते लालचक्की चौक व्हाया पेट्रोल पंप आणि हिललाईन पोलीस स्टेशन पर्यतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे.

३) उल्हासनगर-१ येथील ए ब्लॉक ते साईबाबा टेम्पल व्हाया डॉल्फीन कल्ब ते सेंच्युरी ग्राउड ते गुरुद्वारा पर्यतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे.

४) उल्हासनग-४ येथील वाको कंपाऊड ते व्हीनस चौक (दुतर्फा नाली बांधणे) पर्यतच्या रस्त्याच सिमेंट कॉक्रीटीकरण करणे.

५) उल्हासनगर-४ येथील सोनार चौक ते कोयंडे पुतळा वाया शारदा कॅसेल पर्यतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे.

६) उल्हासनगर-३ येथील हिराघाट टेंपल ते डर्बी हॉटेल व्हाया समर्पन अपार्टमेंट पर्यतच्या रस्त्याच सिमेंट कॉक्रीटीकरण करणे.

७) उल्हासनगर-३ येथील शामा प्रसाद मुखर्जी चौ क ते शांतीनगर व्हाया विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन पर्यतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे.

सदर ७ रस्त्यांची कामे महत्वाकांक्षी असून, सदर रस्त्यांच्या कामांकरीता मंजूर झालेल्या निधीचे विहीत मुदतीत विनियोग होणे आवश्यक आहे. याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग, पाणी पुरवठा, प्रभाग समिती क्र.१ ते ४, यांनी वेळोवेळी मुंमप्रविप्रा (एमएमआरडीए) यांचेशी समन्वय साधुन काम लवकरात लवकर पूर्ण होणेच नियोजन करावे. तसेच खालीलप्रमाणे कामे करणे करीता मा.आयुक्त महोदयांनी संबधितास मौखिक आदेश दिलेले आहे.

- वरील ०७ रस्ते हे शहरातील प्रमुख रस्ते असून सदरच्या रस्तायाची कामाच्या ठिकाणी, काम करणारा विभाग तसेच संबधित सल्लागार व ठेकेदाराचे नाव, अभियंता दर्शविणारे फळक लावावे.
- सदर ०७ रस्त्याची कामे करतांना पाणी पुरवठा विभागाद्वारे भुयारी गटारे सुरु असलेल्या (एमएमआरडीए) कामामुळे काही ठिकाणी कामे प्रलंबित आहेत.
- उल्हासनगर-१ रस्ता क्र.३, ए ब्लॉक ते साईबाबा टेम्पॅल व्हाया डॉलफिन हया रस्त्यावर काही ठिकणी विद्युत ट्रान्सफॉमर बाधित होत.
- उल्हासनगर-५ रस्ता क्र.२ न्यु इंग्लीश हायस्कुल ते लालचक्की चौक व्हाया पेट्रोल पंप आणि हिललाईन पोलीस स्टेशन या रस्त्यावर काही ठिकाणी मालमत्ता बाधित होत.

सदर बैठकीस मा.आयुक्त तसेच खालीलप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे श्री.अर्जुन कोरेगावर, अधिक्षक अभियंता (मुंमप्रविप्रा), श्री.किशोर गवस, अतिरिक्त आयुक्त (२), श्री.तरुण शेवकानी, शहर अभियंता,श्री.हनुमंत खरात, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग, श्री. परमेश्वर बुडगे, कार्यकारी अभियंता (पा.पु), प्रभाग समिती क्र.१ ते ४ चे प्रभाग अधिकारी व इतर अधिकारी तसेच एम.एम.आर.डीए. चे संबधित सल्लागार व ठेकेदार उपस्थित होते.

८/१०/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.